पाकिस्तानच्या गोळीबारात जवान शहीद

पीटीआय, जम्मू

पाकिस्तानच्या सैनिकांनी शस्त्रसंधीचे उल्लंघन करून जम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवर केलेल्या गोळीबारात आणि तोफांच्या माऱ्यात लष्करातील एक जवान शहीद झाला.

पाकिस्तानने मंगळवारी सलग

किशन लाल

तिसऱ्या दिवशी शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. पाकिस्तानच्या या आगळिकीला भारतीय जवानांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले त्यामध्ये पाकिस्तान लष्कराच्या ठाण्यांचे अतोनात नुकसान झाले असून काही सैनिकही ठार झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पाकिस्तानच्या हल्ल्यात नाईक किशन लाल (३४) शहीद झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सुंदरबनी येथे पाकिस्तानच्या लष्कराने शस्त्रसंधीचे उल्लंघन करून हल्ला केला. त्याला भारतीय जवानांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले.

अॅबॉट इंडिया लिमिटेड

सीआयएन : एल२४२३९एमएच१९४४पीएलसी००७३३०

नोंदणीकृत कार्यालय : ३, कॉर्पोरेट पार्क, सायन-ट्रॉम्बे रोड, मुंबई-४०० ०७१.

फोन नंबर : ०२२-६७९७ ८८८८/३८१६ २०००, फॅक्स नं.: ०२२-६७९७ ८७२७/३८१६ २४००

ईमेल आयडी : investorrelations.india@abbott.com वेबसाइट : www.abbott.co.in

पंचाहत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा, रिमोट ई-व्होटिंग व बुक क्लोजर यांची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता वार्षिक अहवाल, रिमोट ई-व्होटिंग फॉर्म, प्रतिनिधित्वाचे प्रपत्र आणि अटेण्डन्स स्लीपसमवेत जी सदस्यांना पाठविण्यात आली आहे त्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे कामकाज करण्यासाठी गुरुवार, २२ ऑगस्ट २०१९ रोजी दुपारी ३.३० वाजता वाय. बी. चव्हाण ऑडिटोरियम, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई-४०००२१ येथे अॅबॉट इंडिया लिमिटेडची (''कंपनी'') पंचाहत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') घेण्यात येणार आहे. अशीही सूचना देण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ (''अधिनियम'')च्या कलम ९१ चे उपबंध आणि वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे दी सिक्युरिटीज अॅण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (''विनियम'') अन्वये, कंपनीची लाभार्थी मालकांची नोंद वही, सदस्यांची नोंद वही आणि भाग हस्तांतरण पुस्तके शुक्रवार, १६ ऑगस्ट २०१९ पासून गुरुवार, २२ ऑगस्ट २०१९ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

संचालक मंडळाने शिफारस केलेला, ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या वर्षाकरिता प्रति समभाग रु.५०/-चा अंतिम लाभांश आणि रु.१५/-चा विशेष लाभांश, येत्या एजीएममध्ये सदस्यांनी संमत केल्यास २२ ऑगस्ट २०१९ रोजीनुसार ज्यांची नावे सदस्यांच्या नोंद वहीत नमूद असतील व या उद्देशासाठी डिपॉझिटरींनी सादर केलेल्या तपशिलानुसार जे १५ ऑगस्ट २०१९ रोजीनुसार भागांचे लाभार्थी मालक असतील अशा सदस्यांना २८ ऑगस्ट २०१९ रोजी व पासून प्रदान केला जाईल.

कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम २०१५ चा नियम २० आणि विनियमांचा विनियम ४४, सोबत वाचावयाच्या अधिनियमाच्या कलम १०८ नुसार, पंचाहत्तराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची माहिती देण्याच्या सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारा आपली मते नोंदविण्याकरिता सदस्यांना कंपनीकडून रिमोट ई-व्होटिंग सुविधा देऊ करण्यात आली आहे.

इन्स्टा पोल माध्यमातून मतदान करण्याची सुविधा सभेमध्ये पुरविण्यात येईल. रिमोट ई-व्होटिंगद्वारा अगोदर ज्यांनी आपले मत नोंदविले नसेल अशा, सभेला उपस्थित सदस्यांना, या सभेत मतदान करण्याचा अधिकार मिळेल. रिमोट ई-व्होटिंगमार्फत आपला मतदानाचा हक्क बजावल्यानंतरसुद्धा सदस्य या सभेत सहभागी होऊ शकतात. परंतु, या सभेत त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.

अधिनियम आणि त्याखाली बनविलेले नियम यानुसार आवश्यक असलेले तपशील, खाली देण्यात येत आहेत :

१. पंचाहत्तराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची माहिती देणारी सूचना, रिमोट ई-व्होटिंग फॉर्म, प्रतिनिधित्वाचे प्रपत्र आणि अटेण्डन्स स्लीप समाविष्ट असलेला, आर्थिक वर्ष २०१८-१९ चा वार्षिक अहवाल सदस्यांना ३० जुलै २०१९ रोजी पाठविण्यात आला आहे/ (कंपनीकडे/डिपॉझिटरींकडे नोंदविलेल्या ईमेल आयडींवर) ईमेल करण्यात आला आहे. पूर्वीक्त कागदपत्रे कंपनीच्या वेबसाइटवर www.abbott.co.in मध्ये आणि कार्वी फिन्टेक प्रायव्हेट लिमिटेड (''कार्वी'')च्या वेबसाइटवर https://evoting.karvy.com मध्येसुद्धा उपलब्ध आहेत.

२. कंपनीच्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधा पुरविण्याकरिता कंपनीने कार्वीच्या सेवांना याकामी गुंतविले आहे.

३. रिमोट ई-व्होटिंग सुविधा, पुढील मतदान कालावधीत उपलब्ध असतील :

रिमोट ई-व्होटिंगचा प्रारंभ :	**सोमवार, १९ ऑगस्ट २०१९ रोजी सकाळी (भारतीय प्रमाणवेळेनुसार) ९ वाजल्यापासून**
रिमोट ई-व्होटिंगची समाप्ती :	**बुधवार, २१ ऑगस्ट २०१९ रोजी सायं. (भारतीय प्रमाणवेळेनुसार) ५ वाजेपर्यंत**

पूर्वोक्त तारीख व वेळेनंतर रिमोट ई-मतदान करता येणार नाही आणि पूर्वोक्त कालावधी संपल्यावर कार्वीकडून रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल अक्षम करण्यात येईल.

४. **रिमोट ई-व्होटिंगकरिता आणि वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान करण्याकरिता कट-ऑफ डेट आहे १५ ऑगस्ट २०१९ (''कट-ऑफ डेट'').** कट-ऑफ डेट रोजीनुसार सदस्यांच्या नोंद वहीत किंवा डिपॉझिटरींनी केलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंद वहीत ज्यांचे नाव नमूद असेल अशाच व्यक्तींना रिमोट ई-व्होटिंग सुविधेचा लाभ घेण्याचा तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेत इन्स्टा पोलद्वारा मतदान करण्याचा अधिकार मिळेल.

५. कट-ऑफ डेट रोजीनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलाच्या ज्या प्रमाणात त्यांचे भाग असतील त्या प्रमाणात सदस्यांचे मतदानाचे हक्क असतील.

६. कंपनीकडे ज्यांचे ईमेल आयडी नोंदविलेले आहेत अशा सदस्यांच्या बाबतीत यूजर आयडी आणि पासवर्ड कार्वीद्वारा ईमेलमार्फत पाठविला जाईल. वार्षिक अहवाल आणि अन्य कागदपत्रे यांची प्रत्यक्ष प्रत मिळवणाऱ्या सदस्यांच्या बाबतीत, यूजर आयडी आणि पासवर्ड हे रिमोट ई-व्होटिंग फॉर्ममध्ये देण्यात आले आहेत. सदस्य जर रिमोट ई-व्होटिंगसाठी अगोदरच कार्वीकडे नोंदणीकृत असेल तर आपले मत नोंदविण्यासाठी ते आपला विद्यमान यूजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात.

७. या सूचनेच्या पाठवणीच्या तारखेनंतर कंपनीचे भाग संपादन करणारी व कंपनीचा सदस्य बनणारी आणि कट-ऑफ डेट रोजीनुसार भाग धारण करीत असलेली कोणतीही व्यक्ती einward.ris@karvy.com वर विनंती पाठवून यूजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते.

८. इन्स्टा पोलमार्फत मतदान करण्याची सुविधा, वार्षिक सर्वसाधारण सभेत पुरविण्यात येईल. सभेला हजर राहणारे आणि रिमोट ई-व्होटिंगद्वारा अगोदर ज्यांनी आपले मत नोंदविले नसेल असे सदस्य, सभेमध्ये मतदान करू शकतील.

९. रिमोट ई-व्होटिंगमार्फत मतदान करण्याचा हक्क बजावल्यानंतरसुद्धा सदस्याला वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होता येईल. परंतु, सभेत त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.

१०. सदस्याने रिमोट ई-व्होटिंगद्वारा एकदा ठरावावर मतदान केले की, नंतर त्याला त्यात फेरबदल करता येणार नाही अथवा पुन्हा मतदान करता येणार नाही.

११. उचित आणि पारदर्शक पद्धतीने ई-मतदान प्रक्रियेचे परिनिरीक्षण करण्याकरिता परिनिरीक्षक म्हणून श्री. तैहुन एम. खुब्रो, कार्यरत कंपनी सचिव (सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस नं. ८८) (सदस्यत्व क्र. एफसीएस ९९३) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

१२. सभेतील मतदान संपल्यानंतर परिनिरीक्षक, सभेत मतदानाने दिलेली मते मोजतील आणि कंपनीच्या सेवेत नसलेल्या, किमान दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत रिमोट ई-व्होटिंगमार्फत देण्यात आलेली मते अनलॉक करतील व वार्षिक सर्वसाधारण सभेच्या समाप्तीनंतर अठ्ठेचाळीस तासांच्या आत, बाजूने किंवा विरोधात, असल्यास, पडलेल्या एकूण मतांचा एकत्रिकृत परिनिरीक्षकांचा अहवाल अध्यक्षांकडे किंवा त्यांनी लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडे सादर करतील जे त्यावर प्रतिस्वाक्षरी करतील आणि मतदानाचा निकाल ताबडतोब जाहीर करतील.

१३. वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यापासून अठ्ठेचाळीस तासात किंवा अठ्ठेचाळीसाव्या तासाला अध्यक्षांद्वारा अथवा त्यांनी लेखी स्वरूपात प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीद्वारा निकाल जाहीर केले जातील. जाहीर केलेला निकाल, परिनिरीक्षकांच्या एकत्रिकृत अहवालासह कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजेच www.abbott.co.in मध्ये आणि कार्वीच्या वेबसाइटवर म्हणजेच https://evoting.karvy.com मध्ये, निकाल जाहीर झाल्यानंतर ताबडतोब प्रसृत केले जातील. त्याचवेळी बीएसई लिमिटेड, मुंबई यांच्याकडे निकाल पाठविण्यात येईल.

१४. मतदान करण्याची सविस्तर प्रक्रिया व पद्धत, वर्ष २०१८-१९ च्या वार्षिक अहवालासोबत सदस्यांना पाठविलेल्या एजीएमच्या सूचनेला जोडलेल्या रिमोट ई-व्होटिंग फॉर्ममध्ये देण्यात आली आहे.

१५. **आवश्यक संख्येत मते मिळण्यासापेक्ष, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेला म्हणजेच २२ ऑगस्ट २०१९ रोजी ठराव पारित झाल्याचे मानण्यात येईल.**

१६. काही विचारणा असणाऱ्या सदस्यांनी https://evoting.karvy.com च्या डाऊनलोड्स सेक्शनवर उपलब्ध (i) रिमोट ई-व्होटिंग यूजर मॅन्युअल किंवा (ii) हेल्प अॅण्ड फ्रिक्वेंटली आस्क क्वेश्चन्स (एफएक्यू) पाहावेत अथवा निःशुल्क क्रमांक १८००-३४५४-००१ वर फोन करावा.

१७. सदस्यांनी रिमोट ई-व्होटिंग संबंधित विचारणा/गाऱ्हाणी यांना संबोधित करावीत :

कार्वी फिन्टेक प्रायव्हेट लिमिटेड
श्री. प्रेमकुमार नायर - व्यवस्थापक - कॉर्पोरेट रजिस्ट्री
कार्वी फिन्टेक प्रायव्हेट लिमिटेड
कार्वी सेलेनिअम टॉवर बी, प्लॉट ३१-३२,
गचिबाऊली, फिनान्शिअल डिस्ट्रिक्ट,
नानकरामगुडा, हैदराबाद-५०० ०३२
ई-मेल : einward.ris@karvy.com
फोन नंबर : +९१-४०-६७१६ १५२५
फॅक्स नंबर : +९१-४०-२३०० ११५३

मंडळाच्या आदेशावरून
कृपा आनंदपारा
कंपनी सचिव
सदस्यत्व क्रमांक : एसीएस १६५३६

स्थळ : मुंबई
दिनांकित : ३१ जुलै, २०१९

Abbott